जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAY 2018
लोकमत

# विद्यापीठ प्रवेश परीक्षांचा आज अखेरचा दिवस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येत असलेल्या प्रवेश परीक्षांचा आज, मंगळवारी अखेरचा दिवस आहे. एम. एस्सी. आणि एमबीए अभ्यासक्रमांसाठी सोमवारी एकूण ९५९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठातर्फे दि. २२ मेपासून या प्रवेश परीक्षांना ऑनलाईन पद्धतीने सुरुवात झाली. त्याअंतर्गत मंगळवारी एम. एस्सी. इन्व्हारमेंटल सायन्स, फूड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, एम. एस्सी. टेक (रुलर टेक्नॉलॉजी), एम.बी.ए. अभ्यासक्रमाची परीक्षा झाली. त्यासाठी एकूण १०९३ जणांनी नोंदणी केली. त्यापैकी ९५९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १३४ जण अनुपस्थित राहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAY 2018
Times of India

# UGC: Spread awareness on drug, tobacco addiction

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked varsities and colleges across the country to spread awareness against use of tobacco, alcohol and drugs.

The UGC has asked the institutions to hold orientation programmes targeting the freshers. "Instructions regarding spreading anti-intoxicants awareness through institutional and academic mechanisms were given in past and should be effectively implemented," UGC secretary Rajnish Jain said in the letter.

"I would like to reiterate that addiction to tobacco, alcohol and drugs is a serious issue among youth and it merits our undivided attention. I am sure your university has incorporated informative inputs on aspects of this malady appropriately, including in curricula of programmes offered at various levels. Apart from organising these orientation programmes, targeting the freshers would serve as an effective instrument of positively structuring their mindsets," Jain said.

He added that institutions may also use opportunities like annual day, cultural festivals and even convocation days to underscore the ills of addiction in symbolic as well as material ways.

"A mechanism should be set up to ensure strict compliance in this regard. This will ensure that youth of this country remains positive and contributes in national development," Jain added.

Sattappa Mohite, a city-based education activist, said that awareness against addiction is needed and the colleges need to organise various programmes. "Hopefully after the UGCs instructions, steps will be taken in this regard," he said.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAY 2018
तरूण भारत

# क्रीडा महोत्सवातील सहभागी खेळाडूंचा आज सत्कार

**कसबा तारळे :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषद २०१७-१८ द्वारा दूधसाखर महाविद्यालय, बिद्री यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय, पश्चिम विभाग क्रीडामहोत्सव स्पर्धेतील यशस्वी व सहभागी खेळाडूंचा सत्कार सोहळा मंगळवार २९ रोजी सकाळी १० वाजता भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे होणार आहे. हा सत्कार सोहळा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती डॉ. एन. डी. पाटील तारळेकर यांनी दिली. शिक्षक व खेळाडूंचा TA.DA जिमखाना फी मधून करणे बाबतचे पत्र कॉलेजच्या ईमेलवर पाठवले असून कार्यक्रमासाठी खेळाडूंचे ओळखपत्र अनिवार्य आहे. तरी या कार्यक्रमासाठी अधिकाधिक खेळाडूंनी हजर राहावे, असे आवाहन केले आहे.

29 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेध नव्या कॅम्पसचे...

ऐमन देसाई
एम. ए. मास कम्युनिकेशन, शिवाजी विद्यापीठ



कॉलेजमधील पदवी अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर पुढील पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची पाऊले विद्यापीठाकडे वळतात. प्रत्येक अधिविभागात प्रवेश घेण्याआधी प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. त्यात उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्या त्या अधिविभागात प्रवेश दिला जातो. शिवाजी विद्यापीठात कोल्हापूरसोबत सांगली, सातारा, सोलापूर जल्ह्यातून विद्यार्थी सध्या प्रवेश परीक्षेसाठी येत आहेत. आता वेध लागलेत ते पुढील प्रवेशाचे

सध्या विद्यापीठात विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी लगबग सुरू आहे. ऑनलाइन आणि ऑफलाइन त्यासाठी निरनिराळ्या अधिविभागात विद्यार्थ्यांची गर्दी दिसून येत आहे. कॉलेजमंधील शिक्षण संपवून विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याकडे हजारो प्रश्न, आखून ठेवलेल्या कल्पना, नव्या वाटचालीची आतूरता दिसून येत आहे.

२२ मेपासून विविध अधिविभागांच्या प्रवेश परिक्षांना सुरुवात झाली. त्यामध्ये एम. ., एमएसस्सी,मास कम्युनिकेशन, बी.जे.सी., एम. जे. सी., विविध भाषा, एम. कॉम., विषय बदलासाठी आदी २४ विभागात प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या आहेत. या परीक्षांचा निकाल लागायला अजून अवधी असला तरी पुढील प्रवेशाची अधीरता लागून राहिल आहे.

प्रवेश परीक्षेसाठी सोलापूर, सांगली, सातारा, उस्मानाबाद व कोल्हापूर जिल्ह्यातून विद्यार्थी मोठ्या संख्येने येतात. विज्ञान, वाणिज्य, तंत्रज्ञान, साहित्य या क्षेत्रात विद्यापीठाने मागील काही वर्षात उल्लेखनीय प्रगती केल्यामुळे विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे. प्रवेशासाठी आलेल्या बहुतांश विद्यार्थ्यांची विद्यापीठात ही पहिलीच वेळ असते, ती उत्सुकता, ती भीती त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येते.

विद्यापीठात प्रवेशासाठी आल्यावर आपला अधिविभाग शोधण्याची ती गडबड त्यात रस्ताच चुकणे अशा गमतीही दिसून येत आहेत. तसेच मुख्य इमारतीत चलन करण्यासाठी असलेली गर्दी, लायब्ररी जवळ ऑनलाइन फॉर्मसाठी झालेली गर्दी बघायला मिळते. आपली परीक्षा किती तारखेला आहे, कोणत्या ठिकाणी होणार याची उत्सुकता ताणलेली असते. नवीन विद्यापीठ, नवीन परिसर, नवीन मित्र मैत्रीणी यांचा आनंद हा असतोच. पण त्याचप्रकारे भीती देखील असते. आपण या वातावरणामध्ये मिसळू शकू का? विविध प्रश्न मनामध्ये भीती निर्माण करतात. त्यामध्ये जर आपण एकटे असलो तर झालंच मग....कोल्हापुरातील जवळच्या परिसरातील राहणारे विद्यार्थी असले की बाहेरच्या येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जणू ते आव्हानच असते. कारण कोल्हापूर आणि येथील लोक यांच्याविषयी एक वेगळीच औत्सुक्य निर्माण झालेले असते. पण शैक्षणिक पातळीवर जाऊन विचार करणारे विद्यार्थी या सगळ्यांचा विचार करत बसत नाहीत. मुलांच्या किती चर्चा सुरु असतात. जर ॲडमिशन झाले की हे करणार, त्यात मुलींची तर विचारुच नका. नुसत्या चर्चांच चर्चा, आधी प्रवेश परीक्षा, प्रवेश मिळाला की ती गडबड, मग कॉलेजची गडबड, त्यातच पहिली सेमिस्टर कधी येते कळत नाही. मग आणि निकालाची गडबड या सगळ्या धांदलीमध्येच वर्ष कसे संपते ते कळत नाही. परत पुढच्या वर्षी सुरू होणाऱ्या त्याच लगबगीसाठी प्रत्येक वेळी लाखोने विद्यार्थी तयार होतच असतात. आणि त्यांची उच्च शिक्षण घेण्याबद्दलची संख्या आणि इच्छा ही वाढतच राहते.

29 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




# गाडी सुटली... रुमाल हलले...

मोनिका क्षीरसागर
सीसीआर, वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभाग

गाडी सुटली, रुमाल हलले, क्षणात डोळे टचकण ओले...' ही कविता तरुण तरुणींच्या ओठावर येते ती परीक्षा संपून होस्टेल सोडताना. काहीसा कातर, हळवा असलेला हा क्षण कधीच आपल्या आयुष्यात येऊ नये असे प्रत्येकाला वाटत असते. पण परीक्षा संपल्या की होस्टेल सोडून काही काळासाठी घरी जायचं आणि मग भाकरीचा चंद्र शोधण्यासाठी दुनियेच्या मॅरेथॉनमध्ये धावायला बाहेर पडतो.

झाडाफुलांनी बहरलेला उन्हाळ्यातही थंडगार परिसर म्हणजे शिवाजी विद्यापीठ. उच्च शिक्षणासाठी बराचसा काळ इथं घालविल्यानंतर जणू हे दुसरे घरच तयार झालेले असते. हे घर सोडताना मनाची घालमेल होते.

एखाद-दुसरा विद्यार्थी, कालाच्या कामात व्यस्त असणारा कर्मचारी वर्ग आणि झाडे, झुडपे असलेला निरभ्र शांततेचा परिसर नजरेस पडतो. तसेच, विविध पक्षांचे आवाज, त्यांचा किलबिलाट व वाऱ्याच्या मंद झुळकेचा आवाज अनुभवायला मिळतो. सध्या सर्वच डिपार्टमेंटच्या प्रॅक्टिकल आणि लेखी परीक्षा संपल्यामुळे नेहमीच विद्यार्थ्यांनी खच्च भरलेले डिपार्टमेंट्स, मुख्य इमारत, खर्डेकर ग्रंथालय, लेडीज होस्टेल, बॉइज हॉस्टेल व भाषा भवन चे कॅन्टिनसुद्धा रिकामी आहेत.

खरे तर, कॅन्टिन आणि गार्डनमध्ये येणारी मजा काही औरच असते. या परिसरात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे गार्डन आणि कॅन्टीनशी असणारे नाते एवढे अतूट असते की, डिपार्टमेंटला हजेरी लावण्याआधीच ते कॅन्टिन आणि गार्डनमध्ये उपस्थिती लावून मोकळे होतात. लेक्चर बंक करून कट्ट्यांवर घालवलेले दिवस, हातात कटिंग चहा घेत गप्पांच्या रंगलेल्या मैफिली, परीक्षा जवळ येताच, गार्डनमध्ये अभ्यास करणारे ग्रुप अशा अनेक घटनांनी विद्यापीठाचा परिसर नेहमीच गजबजलेला असतो, मात्र आता या परिसरात भयाण शांतता अनुभवायला येते.

विद्यापीठामध्ये शिक्षण घेणारी ही पाखरे नेहमीच या परिसरात किलबिल करत असतात. मित्र मैत्रिणींचे सुखद, दुखत क्षण, त्यांची मजा मस्ती, वाढदिवस, परीक्षेला मिळालेले चांगले मार्क्स, सेट-नेट,लोकसेवा-राज्यसेवा या परीक्षांमध्ये यश मिळाल्यानंतर केलेले सेलिब्रेशन अनेक प्रसंग या परिसराने अनुभवलेले आहे. सध्या मात्र सगळा विद्यापीठाचा परिसर ओस पडलेला दिसतो.

एप्रिल-मे महिन्याच्या हा काळच असा आहे की, जो कॉलेज व विद्यापीठातील परिसराला एकटा पाडतो. परीक्षा संपवून घरी जाताना, गप्पांना येणारे उधान, मजा-मस्ती, एकमेकांची उडविलेली खिल्ली हे सगळं आता कधी अनुभवायला मिळणार हा एकच प्रश्न प्रत्येक मुला-मुलींच्या चेहऱ्यावर दिसत होता. विद्यापीठाचा परिसर सोडून जाताना, खरंच सगळ्यांचे डोळे पाणावलेले असतात. पण घरी जाण्याचीही तितकीच ओढ असल्यामुळे विद्यार्थी कसेबसे सावरतात.